नॅशनल केमिकल लॅबोरेटरी संस्थेनं बनवला एलपीजी गॅसला पर्याय >>पान 2

लोणार तालुक्यातील हिरडव येथे महाराजस्व समाधान शिबिराचं केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले उद्घाटन >>पान 3

मातोश्री येथे पार पडला शिवसेना पक्षप्रवेश सोहळा >>पान 4


**सुविचार**

क्रांती हळूहळू घडते, एका क्षणात नाही.


दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 215 ■ रविवार, दि. 15 मार्च 2026 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




सखे ग साजणी चित्रपटाच्या यशाकरिता प्रार्थना बेहेरे पतीसह साईबाबांच्या चरणी नतमस्तक

आतील पान

## एकीकडे इराण न् अमेरिका युद्ध शिगेला, दुसरीकडे किम जोंग उन मैदानात, उत्तर कोरियाने १० बॅलेस्टिक मिसाईल सोडल्या

नवी दिल्ली : एकीकडे इराण विरुद्ध इस्रायल, अमेरिका यांच्यातील युद्ध शिगेला पोहोचले असताना आता युद्धासाठी कधीही एका पायावर तयार असणारे उत्तर कोरियाचे सर्वेसर्वा किम जोंग उन मैदानात उतरण्याची शक्यता आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, उत्तर कोरियाने युद्धाचा सराव सुरु केला आहे. उत्तर कोरियाच्या लष्कराने शनिवारी पूर्व समुद्रकिनाऱ्यावरुन १० बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे (रत्त्ूिम्मब स्म्गत)डागली आहेत. ही केवळ क्षेपणास्त्रांची चाचणी असल्याचे सांगितले जात आहे. उत्तर कोरिया आणि जपानने १० बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे डागल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

दक्षिण कोरियाकडूनही उत्तर कोरियाकडून क्षेपणास्त्रांची चाचणी करण्यात आल्याच्या वृत्ताबाबत भाष्य करण्यात आले आहे. उत्तर कोरियाने पूर्वे समुद्रकिनाऱ्यावरुन अज्ञात वस्तू प्रक्षेपित ( संभाव्य क्षेपणास्त्र चाचणी) केल्याचे दक्षिण कोरियाचे म्हणणे आहे. जपान या सगळ्या परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. उत्तर कोरियाने सोडलेली क्षेपणास्त्रे समुद्रात पडल्याची माहिती जपानकडून देण्यात आली आहे. सध्या दक्षिण कोरियन लष्कराच्या वार्षिक सैन्य कवायती (फ्रीडम शिल्ड) सुरु आहेत. उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरिया यांच्यात असलेल्या पूर्वापार संघर्षामुळे उत्तर कोरियाकडून दक्षिण कोरियाच्या या वार्षिक सैन्य कवायतींना विरोध केला जातो. उत्तर कोरियाने शनिवारी अचानक बॅलेस्टिक क्षेपणास्त्रांची चाचणी का केली, हे अद्याप समजू शकलेले नाही. मात्र, प्रचंड मोठी लष्करी ताकद, आधुनिक युद्धसाम ुग्री आणि अणवस्त्रधारी असलेला उत्तर कोरिया या सगळ्या संघर्षात उतरल्यास हे युद्ध आणखी चिघळण्याची शक्यता आहे. त्यामुळे जगभरातील सर्व देश उत्तर कोरियाच्या हालचालींकडे लक्ष ठेऊन आहेत. .

## मिठी नदीतील गॅस साठा म्हणजे भ्रष्टचाराचा कचरा; रितू तावडे यांचा पेंग्विन सेनेवर घणाघाती प्रहार!

**मुंबई** – भाजप नेत्या आणि महापौर रितू तावडे यांनी फेसबुकच्या माध्यमातून एक आक्रमक पोस्ट शेअर करत उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेवर (ळँऊ) जोरदार हल्ला चढवला आहे. ''मिठी नदीतून निघणारा गॅस ही नैसर्गिक संपत्ती नसून, गेली २५ वर्षे मुंबईवर सत्ता गाजवणाऱ्यांच्या भ्रष्टाचाराचा साचलेला कचरा आहे,'' अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला आहे.

रितू तावडे यांनी आपल्या पोस्टमध्ये मुंबई म हापालिकेतील सत्ताधाऱ्यांच्या अकार्यक्षमतेवर बोट ठेवले आहे. मिठी नदीच्या रुंदीकरणासाठी आणि स्वच्छतेसाठी 'ब्रिमस्टोवॅड' प्रकल्पांतर्गत हजारो कोटी रुपये खर्च करण्यात आले. मात्र, इतका मोठा निधी खर्च होऊनही प्रत्येक पावसाळ्यात मुंबई का बुडते? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. ''हा पैसा मुंबईकरांच्या हितासाठी वापरण्याऐवजी मातोश्रीच्या लाडक्या कंत्राटदारांच्या तिजोरीत गेला आहे,'' असा खळबळजनक आरोपही त्यांनी यावेळी केला.

देशाला ऊर्जेच्या क्षेत्रात स्वयंपूर्ण करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी रात्रंदिवस प्रयत्न करत असताना आणि 'उज्ज्वला' योजनेद्वारे घराघरात गॅस पोहोचवत असताना, मुंबईतील नेत्यांनी मात्र येथील जलस्त्रोतांना 'गॅस चेंबर' बनवून ठेवले आहे, अशी टीका तावडे यांनी केली. मिठी नदीच्या दुर्गंधीमुळे स्थानिक नागरिकांना श्वसनाचे आजार होत असून, स्वत:ला 'पर्यावरण प्रेमी' म्हणवणारे नेते २५ वर्षांत एक नदी स्वच्छ करू शकले नाहीत, हेच त्यांच्या सत्तेचे सर्वात मोठे अपयश असल्याचे त्यांनी नमूद केले.

# सोनम वांगचुक यांच्यावरील एनएसए केंद्र सरकारकडून रद्द

## १७० दिवसांनंतर जोधपूर जेलमधून तत्काळ सुटका होणार



नवी दिल्ली : लडाखमधील सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांची लवकरच कारागृहातून सुटका होणार आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाने त्यांची सुटका करण्याचे अधिकृत आदेश जारी केले आहेत. लडाखमध्ये शांतता, स्थिरता आणि परस्पर विश्वासाचे वातावरण निर्माण करण्यासाठी वांगचुक यांची सुटका करण्याचा निर्णय घेतल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

सोनम वांगचुक यांना गेल्या वर्षी २६ सप्टेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत (न्एअ) ताब्यात घेण्यात आले होते. २४ सप्टेंबर रोजी लेहमध्ये कायदा आणि सुव्यवस्थेची गंभीर स्थिती निर्माण झाल्याने जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली होती. वांगचुक यांनी आतापर्यंत त्यांच्यावरील अटकेच्या कालावधीचा अर्ध्याहून अधिक काळ तुरुंगात घालवलाआहे. सध्या ते राजस्थानमधील जोधपूर केंद्रीय कारागृहात बंदिस्त आहेत.

लडाखला राज्याचा दर्जा मि ळावा आणि संविधानाच्या सहाव्या अनुसूचीमध्ये त्याचा समावेश व्हावा, या मागणीसाठी गेल्या वर्षी लेहमध्ये हिंसक निदर्शने झाली होती. या हिंसाचारात चार जणांचा मृत्यू झाला होता. या घटनांना प्रवृत्त केल्याचा आणि हिंसा भडकवल्याचा ठपका ठेवत सरकारने वांगचुक यांना ताब्यात घेतले होते.

गृह मंत्रालयाने आपल्या आदेशात म्हटले आहे की, ''सरकार लडाखम धील विविध समुदायांच्या नेत्यांशी सक्रिय संवाद साधत आहे, जेणेकरून तेथील लोकांच्या चिंता आणि आकांक्षांचे निराकरण करता येईल. मात्र, सतत होणारे बंद आणि विरोध प्रदर्शन यामुळे लडाखमधील पर्यटन, विद्यार्थी, व्यावसायिक आणि नोकरी शोधणाऱ्या तरुणांचे मोठे नुकसान झाले आहे.''

लडाखमधील सामाजिक आणि आर्थिक घडी पुन्हा बसवण्यासाठी तसेच सर्व घटकांशी रचनात्मक चर्चा करण्यासाठी सोनम वांगचुक यांची कोठडी तात्काळ रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लडाखची सुरक्षा आणि तिथल्या लोकांचे हित जपण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचेही गृह मंत्रालयाने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे.

मंत्रालयाने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, ''लडाखमध्ये शांतता, स्थिरता आणि परस्पर विश्वासाचे वातावरण निर्माण करण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे, जेणेकरून सर्व भागधारकांशी सकारात्मक आणि अर्थपूर्ण चर्चा होऊ शकेल. हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून सरकारने आपल्या अधिकारांचा वापर करत सोनम वांगचुक यांची कोठडी रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.''

सरकारने असेही नमूद केले की, लडाखमधील लोकांच्या आकांक्षा आणि चिंता दूर करण्यासाठी प्रशासन स्थानिक नेत्यांशी सातत्याने चर्चा करत आहे. मात्र, सध्या सुरू असलेल्या बंद आणि आंदोलनांमुळे तिथल्या शांतताप्रिय समाजावर आणि अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम झाला आहे. विशेषत: विद्यार्थी, नोकरी शोधणारे तरुण, व्यावसायिक, पर्यटन क्षेत्र आणि पर्यटकांना याचा मोठा फटका बसला असल्याचे सरकारने म्हटले आहे.

काय होते आरोप?

२४ सप्टेंबर २०२५ रोजी लेहम ध्ये झालेल्या हिंसक आंदोलनानंतर सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार, २६ सप्टेंबर रोजी वांगचुक यांना न्एअ अंतर्गत ताब्यात घेण्यात आले होते. त्यांनी आतापर्यंत त्यांच्या कोठडीचा जवळपास अर्धा कालावधी पूर्ण केला आहे. मागील वर्षी लेहमध्ये झालेल्या हिंसाचारात ४ जणांचा मृत्यू झाला होता आणि १६० हून अधिक लोक जखमी झाले होते. या हिंसाचाराला प्रवृत्त केल्याचा आरोप वांगचुक यांच्यावर होता. याच आठवड्यात सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणी दरम्यान सरकारने सांगितले की, वांगचुक यांच्या विधानांमुळे तरुणांना नेपाळ, बांगलादेश किंवा 'अरब स्प्रिंग' सारखी आंदोलने करण्यास प्रोत्साहन मिळत आहे. हे सीमावर्ती भागाच्या सुरक्षेसाठी धोकादायक ठरू शकते, असा युक्तिवाद सरकारने केला होता.

सुप्रीम कोर्टातील सुनावणी

सोनम वांगचुक यांची पत्नी गीतांजली आंगमो यांनी त्यांच्या अटकेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. या याचिकेवर १७ मार्च रोजी सुनावणी होणार होती, परंतु त्यापूर्वीच सरकारने त्यांची सुटका करण्याचा निर्णय घेतला आहे.

## अमेरिकेत ११ भारतीयांवर व्हिसा फसवणुकीचा आरोप; ग्रीन कार्डसाठी रचला बनावट दरोड्याचा कट

न्यूयॉर्क : अमेरिकेतील संघीय अभियोक्त्यांच्या माहितीनुसार, अमेरिकेत बेकायदेशीर राहणाऱ्या ११ भारतीय नागरिकांवर व्हिसा फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या व्यक्तींनी दुकानांमध्ये बनावट सशस्त्र दरोडे घालण्याचा कट रचल्याचा आरोप आहे. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, या संशयितांनी बनावट दरोड्यांची योजना आखली होती. यामागचा उद्देश असा होता की, दुकानातील कर्मचारी इमिग्रेशन अर्जामध्ये खोटा दावा करू शकतील की, ते एखाद्या गुन्ह्याचे बळी ठरले होते, ज्यामुळे त्यांना ग्रीन कार्ड मि ळवणं सोपं होईल.

आरोपींची नावं : या प्रकरणात जितेंद्रकुमार पटेल (३९), महेशकुमार पटेल (३६), संजयकुम ार पटेल (४५), दीपिकाबेन पटेल (४०), रम ेशभाई पटेल (५२), अमिताभहेन पटेल (४३), रौनककुमार पटेल (२८), संगीताबेन पटेल (३६), मिंकेश पटेल (४२), सोनल पटेल (४२) आणि मितुल पटेल (४०) यांच्याविरुद्ध व्हिसा फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हे सर्व आरोपी अमेरिकेतील मॅसॅच्युसेट्स, केंटकी आणि ओहायो या वेगवेगळ्या राज्यांम ध्ये बेकायदेशीरपणे राहात होते. न्याय विभागानं दिलेल्या माहितीनुसार, मॅसॅच्युसेट्समधील वेम ाउथ येथे बेकायदेशीररित्या राहात असलेल्या दीपिकाबेन यांना भारतात परत पाठवण्यात आलं आहे. तर जितेंद्रकुमार, महेशकुमार, संजयकुम ार, अमिताबेन, संगीताबेन आणि मितुल यांना मॅसॅच्युसेट्समध्ये अटक करण्यात आली होती. त्यांना बोस्टन येथील संघीय न्यायालयात शुक्रवारी पहिल्यांदा हजर करण्यात आलं आणि त्यानंतर त्यांची सुटका करण्यात आली. रमेशभाई, रोनककुमार, सोनल आणि मिंकेश यांना अटक करण्यात आली असून त्यांची पहिली सुनावणी केंटकी, मिसौरी आणि ओहायो इथं झाली. पुढील तारखेला त्यांना बोस्टन येथील फेडरल न्यायालयात हजर केलं जाणार आहे.

दारूच्या दुकानांवर बनावट दरोडा : चार्जशीटनुसार, मार्च २०२३ मध्ये रामभाई आणि त्याच्या साथीदारांनी मॅसॅच्युसेट्ससह इतर काही ठिकाणी किमान ६ दुकानं, दारूची दुकानं आणि फास्ट फूड रेस्टॉरंटमध्ये शस्त्रांच्या धाकावर दरोडे घातले. मात्र, हे दरोडे खरे नसून यू नॉन-इमिग्रेशन स्टेटस (यू व्हिसा) मिळवण्यासाठी आखलेले बनावट प्रकार असल्याचा आरोप आहे. यू व्हिसा हा काही विशिष्ट गुन्ह्यांचे बळी ठरलेल्या आणि तपास किंवा खटल्यात कायदा अंमलबजावणी संस्थांना मदत करणाऱ्या व्यक्तींना दिला जातो. या व्हिसामुळे स्थलांतरितांना अमेरिकेत काम करण्याची परवानगी मिळते. तसंच ५ ते १० वर्षांत ग्रीन कार्ड मिळवण्याचा मार्गही खुला होतो.

असा रचायचे दरोड्याचा बनाव : अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, या कथित बनावट दरोड्यांमध्ये 'दरोडेखोर' दुकानातील कर्मचारी किंवा मालकांना शस्त्रासारखी दिसणारी वस्तू दाखवून धमकावत असे. त्यानंतर तो कॅश रजिस्टरमधील पैसे घेऊन पळून जात असे. ही संपूर्ण घटना दुकानातील सीसीटीव्हीमध्ये रेकॉर्ड होत असे. दरोड्यानंतर कर्मचारी किंवा मालक पोलिसांना माहिती देण्यापूर्वी किमान ५ मिनिटं थांबत असत, जेणेकरून 'दरोडेखोर' सुरक्षितपणे निघून जाईल. या कटात सहभागी होण्यासाठी कथित पीडितांनी रामभाईला पैसे दिल्याचा आरोप आहे. त्याबदल्यात रामभाईनं दुकानमालकांना त्यांच्या दुकानांचा वापर बनावट दरोड्यांसाठी करू दिल्याबद्दल पैसे दिले होते.

या प्रकरणातील दरोडेखोर रामभाई आणि त्याला पळून जाण्यास मदत करणाऱ्या चालकावर यापूर्वीच आरोप ठेवून त्यांना दोषी ठरवण्यात आलं आहे. शुक्रवारी ज्या ११ जणांवर आरोप करण्यात आले आहेत, त्यांच्यावर प्रत्येक दरोड्याची योजना आखण्यात मदत केल्याचा किंवा स्वत:ला, कुटुंबातील सदस्यांना पीडित म्हणून दाखवण्यासाठी पैसे दिल्याचा आरोप आहे. व्हिसा फसवणुकीच्या कटाचा आरोप सिद्ध झाल्यास ५ वर्षांपर्यंत तुरुंगवास किंवा २,५०,००० अमेरिकन डॉलर्सपर्यंत दंडाची तरतूद आहे.

## टी-20 विश्वचषक गमावल्यानंतर न्यूझीलंड दक्षिण आफ्रिकेविरुद्ध मैदानात; कुठं पाहायची लाईव्ह मॅच?

माउंट मौंगानुई : २०२६ च्या टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात पराभव झाल्यानंतर, न्यूझीलंड क्रिकेट संघ आता दक्षिण आफ्रिकेचा सामना करण्यासाठी पूर्णपणे सज्ज आहे. दक्षिण आफ्रिकेचा संघ सध्या न्यूझीलंडच्या दौऱ्यावर आहे, ज्यात दोन्ही संघ पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळतील. मालिकेतील पहिला सामना १५ मार्च रोजी बे ओव्हल येथील माउंट मौंगानुई स्टेडियमवर खेळला जाईल.

२०२६ च्या टी-२० विश्वचषकात दोन्ही संघ आले होते आमनेसामने : टी-२० विश्वचषकात न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका यापूर्वी दोनदा एकमेकांसमोर आले आहेत. पहिल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं न्यूझीलंडचा ७ विकेट्सनं पराभव केला. त्यानंतर त्याच टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत ते एकमेकांसमोर आले, जिथं न्यूझीलंडनं दक्षिण आफ्रिकेचा ९ विकेट्सनं पराभव केला. या विश्वचषकात दक्षिण आफ्रिकेनं उपांत्य फेरीत प्रवेश केला, तर न्यूझीलंडनं अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामन्यात कीवी संघाचा भारताशी सामना झाला. ज्यात त्यांना पराभव स्विकारावा लागला.

न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील या मालिकेचा भारतीय चाहते देखील या साम न्याचा आनंद घेऊ शकतील.




## गॅस टंचाईचा परिणाम नाही; देऊळघाटमध्ये आजही कोळशाच्या भट्टीवरच हॉटेल व्यवसाय







**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी** – राज्यात सध्या गॅस टंचाईमुळे अनेक ठिकाणी हॉटेल व्यवसाय अडचणीत आला असून काही हॉटेल्स बंद करण्याचीही वेळ आली आहे. मात्र बुलढाणा जिल्ह्यातील देऊळघाट हे गाव याला अपवाद ठरत आहे.

देऊळघाट गावातील चहाच्या सुमारे आठ ते दहा हॉटेल्स गेल्या वीस ते पंचवीस वर्षांपासून केवळ कोळशाच्या भट्टीवरच चालत आहेत.

या हॉटेल्समध्ये गॅसचा वापर अजिबात केला जात नाही. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या गॅस टंचाईचा या गावातील हॉटेल व्यवसायावर कोणताही परिणाम झालेला नाही.

विशेष म्हणजे संपूर्ण गावातील सर्व हॉटेल्स कोळशाच्या भट्टीवर चालणारे हे बुलढाणा जिल्ह्यातील एकमेव गाव असल्याची माहिती स्थानिकांकडून मिळत आहे.

## जगाच्या अनेक अर्थव्यवस्थांना हादरे...

अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील राजकीय वैमनस्यातून सुरू झालेल्या युद्धाला दोन आठवडे उलटत असून, संपूर्ण आखाती प्रदेश या युद्धाच्या झळा लागून पेटत असताना जगाच्या अनेक अर्थव्यवस्थांना याचे परिणाम कमी-अधिक प्रमाणात जाणवू लागलेले आहेत. इराक, सौदी अरब इत्यादी पेट्रोलियम व खनिजसंपत्तीने संपन्न असलेल्या देशांमधून जगातील कित्येक देशांना होणारी पेट्रोलियमची होर्मुझ सामुद्रधुनीतून होणारी निर्यात ठप्प झाली आहे व त्यातून इंधनटंचाईची एक असाधारण समस्या जगापुढे आ-वासून उभी राहिलेली दिसते. या पार्श्वभूमीवर अनेक देशांना महागाईच्या संकटाचा सामना करावा लागेल व जनसामान्यांचे जीवन विस्कळीत होईल, अशाप्रकारचे एक चित्र निर्माण झालेले आहे. राजकीय अर्थशास्त्राच्या दृष्टिकोनातून या परिस्थितीकडे पाहिले असता, जागतिकीकरणानंतर आयात-निर्यातीच्या संदर्भात देशांचे परस्परावलंबित्व प्रचंड प्रमाणावर वाढले असून, अशाप्रकारची युद्धसदृश्य परिस्थिती निर्माण झाली; तर तिचे परिणाम एका विशिष्ट देशापुरते मर्यादित न राहता, संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेला त्याचे परिणाम भोगावे लागतात. भारताच्या संदर्भात युद्धाच्या पार्श्वभूमीवर महागाईवाढीची कुठलीही शयता दिसत नसून, सुरळीत असलेली पुरवठ्याची साखळी, देशांतर्गत बाजाराचे चोख व्यवस्थापन आणि जागतिक पटलावर होणाऱ्या बदलांवर लक्ष ठेवून उचललेले धोरणात्मक पाऊल या सर्वांमुळे भारतीय बाजारपेठेत महागाईची परिस्थिती निर्माण होणार नाही, असे आश्वासन भारत सरकार, तसेच रिझर्व्ह बँकेच्या माध्यमातून देण्यात आले. भारतीय ग्राहक बाजारपेठेचा विचार करता, महागाईची सध्याची परिस्थिती, युद्धाच्या पार्श्वभूमीवर असलेले संभाव्य धोके आणि भविष्यकालीन अंदाज यादृष्टीने महागाईचे विश्लेषण करता येईल. सध्याच्या परिस्थितीत महागाईचा किंमत निर्देशांक हा २.७५ टक्के एवढा असून, महागाईचा आधारभूत निर्देशांक हा ३.४ टक्के एवढा आहे. जगातील इतर अर्थव्यवस्थांचा विचार करता, भारतातील महागाईचा दर नियंत्रणात असून, युद्धाच्या पार्श्वभूमीवर काही घटकांचा यावर परिणाम होणे अपेक्षित आहे. वित्त मंत्रालय आणि रिझर्व्ह बँक यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार, युद्धाचा महागाईवरील परिणाम टाळण्यासाठी अनेक उपाययोजना करण्यात येत आहेत. इंधनाच्या दरातील बदल, पुरवठा साखळीतील बदल आणि चलन-विनिमय दरातील बदल या तीन घटकांच्या आधारे महागाई व आखाती युद्ध यांचे विश्लेषण करता येईल. साधारणतः भारतीय बाजारपेठेत भाववाढ निर्माण करणारे दोन कारणीभूत घटक म्हणजे पेट्रोलियम व अन्नपदार्थ यांच्यातील दरवाढ होय. भारतीय बाजारात निर्माण होणारी महागाईची परिस्थिती ही अन्नधान्याच्या किमती आणि पेट्रोलच्या किमती यावरून निर्धारित होते. चालू हंगामात शेतीचे पुरेसे उत्पादन झाले असल्याने पुरवठा साखळी सुरळीत असून, त्यातून महागाई निर्माण होण्याची शक्यता नाही. परंतु, युद्धाच्या पार्श्वभूमीवर पेट्रोलियमची आयात वरचेवर महाग होत गेली, तर त्याचा परिणाम प्रकर्षाने दिसून येईल. आपल्या देशात तेलाच्या एकूण गरजेपैकी ८० ते ८५ टक्के तेल आयात केले जाते. तसेच घरगुती व व्यावसायिक वापरासाठीच्या गॅसची आयात ही एकूण आयातीच्या १८ टक्के एवढी आहे. देशाच्या एकूण गरजेच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त 'एलपीजी' गॅसची आयात देशात करावी लागते. सौदी अरब, कतार आणि संयुक्त अरब अमिराती या देशांकडून आपण 'एलपीजी'ची आयात करतो. भारत हा 'एलपीजी' गॅसचा चीननंतर जगातील दुसऱ्या क्रमांकाचा आयात करणारा देश. त्यामुळे तेलाच्या आयातीचा खर्च वाढला, तर त्याचा थेट परिणाम हा देशांतर्गत पेट्रोल व डिझेलच्या किमतीवर दिसून येईल. वाहतूक खर्च वाढेल व त्यातून वस्तू व सेवांच्या किमती वाढतील. तेलाच्या आयातीचा खर्च हा अशाप्रकारे भाववाढीशी थेट संबंधित असतो. गेल्या दोन ते तीन दिवसांत घरगुती गॅस सिलिंडरचे भाव ६० ते ७० रुपयांनी वाढले असून, व्यावसायिक वापरासाठीच्या गॅस सिलिंडरची किंमत साधारणतः ११५ रुपयांनी वाढली असून, त्याचा तुटवडा देशातील अनेक शहरात जाणवत आहे. त्यामुळे हॉटेल व्यवसाय अडचणीत सापडला आहे. घरगुती वापरासाठीच्या गॅस सिलिंडरचा मुबलक साठा देशात असून, लोकांनी साठेबाजी करू नये, यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. तसेच खबरदारीचा उपाय म्हणून देशात अत्यावश्यक वस्तू कायदा लागू केला असून, सरकार सर्व बाजूने परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. पेट्रोल इत्यादी इंधनाच्या किमती महागाईला कारणीभूत ठरत असल्याने देशांतर्गत बाजारात या किमतीचे निर्धारण कसे होते, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. समजा, मुंबईसारख्या शहरात पेट्रोल प्रतिलीटर १०५ रुपये असेल, तर त्यात कच्चे तेल आयात करणे व त्याच्या शुद्धीकरणाचा खर्च हा साधारणतः ३५ ते ४० रुपये, केंद्रीय उत्पादन कराचा वाटा २० ते २५ रुपये, राज्य सरकारचा मूल्यवर्धित कर २५ ते ३० रुपये व शुद्धीकरण केलेल्या तेलाचा वाहतूक खर्च पाच ते १० रुपये एवढा असतो. या सर्व घटकांचा विचार करून पेट्रोल व डिझेलच्या किमती ठरत असतात. तसेच प्रत्येक राज्याचा मूल्यवर्धित कर हा वेगवेगळा असल्याने शहरागणिक पेट्रोलच्या किमती वेगवेगळ्या असतात. तेलाच्या आयातीचा वाढता खर्च लक्षात घेऊन पेट्रोल व डिझेलचे देशांतर्गत उत्पादन वाढवणे, केंद्र व राज्य सरकारच्या पेट्रोलवरील करात बदल करणे व तेलाच्या आयातीचे विविध स्रोत शोधणे या उपाययोजना सरकारकडून केल्या जात आहेत व म्हणूनच, देशात महागाई वाढणार नाही, याची हमी सरकार देत आहे. मागच्या काही वर्षात भारताने रशियाकडून तेल आयात करण्याचे प्रमाण वाढवले असून, मध्य आशियातील आखाती देशांवरील अवलंबित्व कमी केले आहे. २०२४च्या आकडेवारीनुसार, तेलाच्या एकूण आयातीपैकी ३६ टक्के तेल आयात रशियामधून, १३ टक्के आयात सौदी अरबकडून, तर २१ टक्के आयात इराकमधून होत होती. रशियाकडून स्वस्त दरात खरेदी केलेले तेल व ते साठवण्याच्या क्षमतेत केलेली वाढ, यामुळे नजीकच्या काळात देशात तेलटंचाई निर्माण होणार नाही. तसेच रिझर्व्ह बँकेच्या अंदाजानुसार, तेलाची प्रतिपिंप किंमत ९० डॉलरवरून ११० डॉलरपर्यंत गेली, तरी त्याचा देशातील किंमत-पातळीवर होणार परिणाम ०.३ टक्के एवढाच मर्यादित असेल. अर्थात, ही युद्धकालीन परिस्थिती दीर्घकाळ चालू राहिली, तर चलन-विनिमय दरातील अस्थिरता, अनियमित पुरवठा, जागतिक बाजारातील मागणीतील चढ-उतार अशा सर्व बदलांच्या एकत्रित परिणामांमुळे महागाई वाढू शकते.

# नॅशनल केमिकल लॅबोरेटरी संस्थेनं बनवला एलपीजी गॅसला पर्याय

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यात निर्माण झालेल्या युद्ध परिस्थितीमुळं आखाती देशांमध्ये तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीचा फटका जगभरात आता जाणवू लागला आहे. इराणनं होर्मुझ मार्ग बंद केल्यानं गॅसचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळं भारतातील व्यावसायांवर टांगती तलवार आहे. तसंच घरगुती गॅस मिळवण्यासाठी नागरिकांना मोठा संघर्ष करावा लागत आहे. असं असताना पुण्याच्या नॅशनल केमिकल लॅबोरेटरीमधील शास्त्रज्ञांनी एलपीजी गॅसला पर्याय शोधला आहे. तब्बल २० वर्ष संघर्ष करून इथल्या शास्त्रज्ञांनी डायमिथाईल इथर डीएमई या गॅसची निर्मिती केली आहे.

**लवकरच होणार गॅसच्या वापराला सुरुवात**

मागील २० वर्षापासून नॅशनल केमिकल लॅबोरेटरीमधील शास्त्रज्ञ डॉ. तिरुमलाईवामी राजा आणि त्यांच्या टीमनं संशोधन करून या गॅसची निर्मिती केली आहे. या गॅसच्या घरगुती आणि व्यावसायिक वापरासाठी शासनाच्या काही परवानगी मिळाल्यावर याच्या वापराला सुरुवात होणार आहे.

**गॅसची किंमत एलपीजीपेक्षा कमी असणार**

आम्ही मेथेनॉलपासून डायमिथाईल हा पदार्थ बनवतो. कारण याचं एलपीजीसारखं द्रव्य पदार्थामध्ये रूपांतर करत असतो. गेल्या २० वर्षापासून आमची टीम यावर संशोधन करत होती. आता डीएमई या गॅसची निर्मिती केली आहे. या उत्प्रेरकापासून तयार झालेल्या डीएमई गॅसचा व्यावसायिक वापरासाठी उत्पादन करण्यात देखील यश आलं आहे. सध्या पायलट प्रोजेक्टमध्ये दररोज अडीचशे किलोच्या प्रमाणात हा गॅस तयार होत आहे. औद्योगिक कंपन्यांसोबत करार करुन या गॅसचं मोठ्या प्रमाणात उत्पादन झाल्यास हा गॅस एलपीजीमध्ये आठ टक्के इतक्या प्रमाणात मिसळता देखील येऊ शकतो. त्यामुळं इंधनासाठी इतर देशांवर असलेलं अवलंबत्व कमी होण्यास मदत होणार आहे. तसंच मोठ्या प्रमाणात उत्पादन झाल्यास या गॅसची किंमत एलपीजीपेक्षा कमी असेल,'' असा विश्वास नॅशनल केमिकल लॅबोरेटरीचे डायरेक्टर डॉ. आशिष लेले यांनी व्यक्त केला.

**देशभरात गॅसची टंचाई**

युद्धामुळं गॅस, तेल भारतात आयात केलं जात नाही. त्यामुळं संपूर्ण भारतात गॅसची टंचाई जाणवू लागली आहे. मात्र, गॅसची टंचाई नसल्याची माहिती केंद्र सरकारकडून दिली जात आहे. पर्याय म्हणून व्यावसायिक गॅस सिलेंडरवर सध्या बंदी आणली आहे. व्यावसायिक नवीन गॅस टाकी दिली जात नाही. त्यामुळं याचा फटका अनेक उद्योगांना बसला आहे. महाराष्ट्रातील अनेक छोटे उद्योग बंद पडले आहेत. अनेक हॉटेल देखील बंद पडले आहेत.

# गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यासाठी राज्य सरकारची नियमावली

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** इराण आणि इस्राईल दरम्यान निर्माण झालेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर जागतिक इंधन पुरवठा साखळीवर परिणाम झाल्याने राज्य सरकारने खबरदारीचे पाऊल उचलले आहे. घरगुती आणि व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासनाने विशेष नियमावली (एसओपी) जाहीर केली असून, रुग्णालये, शाळा आणि वसतिगृहे यांसारख्या अत्यावश्यक सेवांना गॅस पुरवठ्यात प्राधान्य देण्याचे निर्देश दिले आहेत.

राज्यात इंधनाचा तुटवडा निर्माण होऊ नये आणि नागरिकांमध्ये घबराट पसरू नये, यासाठी अन्न व नागरी पुरवठा विभागाने सूक्ष्म नियोजन केले आहे. एलपीजी सिलिंडरच्या वितरणासाठी आता स्वतंत्र प्राधान्यक्रम निश्चित करण्यात येणार असून, त्यानुसार शासकीय संस्था आणि सार्वजनिक उपक्रमांना पहिला पुरवठा केला जाईल. त्यानुसार रुग्णालये, शासकीय वसतिगृहे, मध्यान्ह भोजन योजना, आश्रमशाळा आणि महाविद्यालयांच्या म `ससाठी गॅसचा पुरवठा प्राधान्याने केला जाईल.

राज्य, विभाग, जिल्हा आणि तालुका स्तरावर तातडीने नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात येणार असून तक्रारींसाठी 'व्हॉट्सॲप' सुविधाही उपलब्ध केली जाईल. गॅस बुकिंग ॲप आणि मिस्ड कॉल सेवेतील तांत्रिक त्रुटी दूर करण्याचे आदेश तेल कंपन्यांना देण्यात आले आहेत. एलपीजी वाहतूक करणारी वाहने आणि गॅस एजन्सींना आवश्यकतेनुसार पोलीस संरक्षण पुरवण्याची जबाबदारी जिल्हा प्रशासनावर असेल. तेल कंपन्या आणि रेशनिंग नियंत्रकांना दररोजचा साठा आणि वितरणाचा अहवाल राज्यस्तरीय नियंत्रण कक्षाला सादर करणे बंधनकारक असेल.

राज्याकडे पुरेसा इंधनसाठा

राज्यात घरगुती गॅसचा कोणताही तुटवडा नसल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. राज्याची दैनंदिन मागणी साधारण ९ हजार मेट्रिक टन इतकी असून, रिफायनरीमधील उत्पादन आता ११ हजार मेट्रिक टनांपर्यंत वाढवण्यात आले आहे.

इंधन साठ्याची स्थिती

विभाग : दैनंदिन मागणी : सद्यस्थिती

घरगुती एलपीजी : ९,००० मे. टन : उत्पादन ११,००० मे. टनांवर पेट्रोल : १५,००० किलो लिटर : साठा मुबलक डिझेल : ३८,००० किलो लिटर : पूर्ण क्षमतेने पुरवठा

स्थानिक लोकप्रतिनिधींची मदत घेणार

गॅस पुरवठ्याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम किंवा घबराट निर्माण होऊ नये, यासाठी ग्रामपंचायत सदस्य आणि स्थानिक लोकप्रतिनिधींची मदत घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आगामी सण-उत्सवांच्या काळात सार्वजनिक संस्थांचा पुरवठा खंडित होणार नाही, याची विशेष काळजी घेतली जाणार आहे. पाईप्ड नॅचरल गॅस (पीएनजी) आणि पेट्रोल-डिझेलचा साठाही पुरेसा असल्याने जनतेने अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन सरकारने केले आहे.

## सखे ग साजणी चित्रपटाच्या यशाकरिता प्रार्थना बेहेरे पतीसह साईबाबांच्या चरणी नतमस्तक

शिर्डी (अहिल्यानगर)- अभिनेत्री प्रार्थना बेहेरेनं सखे ग साजणी या चित्रपटाला यश मिळावं, यासाठी साईमंदिरात दर्शन घेतलं. यावेळी तिनं चित्रपटाविषयी सांगितलं. तसेच वडिलांची आठवणही आल्याचं सांगितलं.

''येत्या ३ एप्रिल रोजी सखे ग साजणी हा मराठी चित्रपट प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट माझ्या पतीनं दिग्दर्शित आणि निर्मित केला आहे. माझा कुठलाही नवीन चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी मी शिर्डी येथे साईबाबांच्या दर्शनासाठी येते. चित्रपटाच्या यशासाठी साईबाबांच्या चरणी प्रार्थना करते. आता ३ एप्रिल रोजी माझा सखे ग साजणी हा चित्रपट प्रदर्शित होणार असल्यानं या चित्रपटाच्या यशासाठी मी पतीसह साईबाबांच्या चरणी प्रार्थना केली आहे'', असं अभिनेत्री प्रार्थना बेहेरेनं सांगितलं.सखे ग साजणी या चित्रपटाचे संपूर्ण चित्रिकरण थायलंडमध्ये करण्यात आलं. हा चित्रपट दोन मैत्रिणींच्या प्रवासावर आधारित आहे. या दोन मैत्रिणी यापूर्वी कधीच देशाबाहेर गेलेल्या नसतात. मात्र, या प्रवासादरम्यान त्यांना अनेक नवीन अनुभव येतात. जीवनात प्रवास करणं किती गरजेचं आहे, हे या चित्रपटातून प्रेक्षकांना सांगण्याचा प्रयत्न चित्रपटाच्या टीमने केला आहे.

# १५ मार्च जागतिक ग्राहक दिन; ग्राहकांना अधिकार देणारा दिवस

आधुनिक अर्थव्यवस्थेत ग्राहक हा केंद्रबिंदू मानला जातो. बाजारपेठेत वस्तू आणि सेवा तयार करणारे उत्पादक, व्यापारी, सेवा पुरवठादार यांचे अस्तित्व ग्राहकांमुळेच टिकून असते. त्यामुळे ग्राहकांचे हित, सुरक्षा आणि अधिकार यांचे संरक्षण करणे ही शासन व समाजाची महत्त्वाची जबाबदारी आहे. या पार्श्वभूमीवर दरवर्षी १५ मार्च हा दिवस 'जागतिक ग्राहक हक्क दिन' म्हणून जगभर साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश ग्राहकांना त्यांच्या अधिकारांची जाणीव करून देणे आणि बाजारपेठेत न्याय्य व्यवहार सुनिश्चित करणे हा आहे.

**ग्राहक म्हणजे काय?**

ज्या व्यक्तीने स्वतःच्या वापरासाठी किंवा उपभोगासाठी एखादी वस्तू खरेदी केली किंवा सेवा घेतली, त्या व्यक्तीला ग्राहक असे म्हणतात. भारतीय कायद्यानुसार, वस्तू किंवा सेवा विकत घेणारा, त्यासाठी किंमत देणारा किंवा त्या सेवेचा लाभ घेणारा प्रत्येक नागरिक ग्राहक मानला जातो. ग्राहक हा अर्थव्यवस्थेतील सर्वात मोठा घटक असून त्याचे संरक्षण हे लोककल्याणकारी राज्याचे कर्तव्य आहे.

**ग्राहकांचे मूलभूत अधिकार**

ग्राहक चळवळीमुळे ग्राहकांना काही मूलभूत अधिकार प्राप्त झाले आहेत. १९६२ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन. एफ. केनीडी यांनी अमेरिकन काँग्रेससमोर ग्राहक हक्कांविषयी ऐतिहासिक भाषण करत चार मूलभूत अधिकार मांडले. त्यात पुढील अधिकारांचा समावेश होता

सुरक्षेचा अधिकार धोकादायक वस्तू किंवा सेवांपासून संरक्षण, माहितीचा अधिकार वस्तूची गुणवत्ता, प्रमाण, किंमत आणि दर्जा याबाबत अचूक माहिती मिळण्याचा




अधिकार, निवडीचा अधिकार विविध पर्यायांमधून वस्तू किंवा सेवा निवडण्याचा अधिकार, मते मांडण्याचा अधिकार ग्राहकांचे मत शासन आणि धोरण प्रक्रियेत ऐकले जाणे.

यानंतर संयुक्त राष्ट्रांनी १९८५ मध्ये ग्राहक संरक्षणासाठी मार्गदर्शक तत्त्वे स्वीकारून ग्राहक शिक्षण, तक्रार निवारण, मूलभूत गरजांची पूर्तता आणि निरोगी पर्यावरणाचा अधिकार यांसारखे अतिरिक्त अधिकारही मान्य केले.

**१५ मार्चलाच ग्राहक दिन का ?**

१५ मार्च १९६२ रोजी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांनी ग्राहक हक्कांचा प्रश्न प्रथमच जागतिक पातळीवर मांडला. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ १९८३ पासून जगभर १५ मार्च हा दिवस 'जागतिक ग्राहक हक्क दिन' म्हणून साजरा केला जाऊ लागला. या दिवशी ग्राहक संघटना, शासन संस्था आणि सामाजिक संघटना ग्राहक हक्कांविषयी जनजागृती कार्यक्रम आयोजित करतात.

**ग्राहक चळवळ म्हणजे काय?**

ग्राहक चळवळ म्हणजे ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी चालवली जाणारी सामाजिक आणि कायदेशीर चळवळ. बाजारपेठेतील फसवणूक, निकृष्ट दर्जाची उत्पादने, अन्यायकारक व्यापार पद्धती आणि ग्राहकांची फसवणूक याविरोधात जनजागृती करणे हा या चळवळीचा मुख्य उद्देश आहे. जगभरातील ग्राहक संघटनांनी एकत्र येऊन ग्राहकांच्या हितासाठी विविध मोहिमा राबवल्या आणि अनेक देशांमध्ये ग्राहक संरक्षणाचे कायदे लागू झाले.

**भारतातील ग्राहक चळवळीची सुरुवात**

भारतामध्ये ग्राहक चळवळ १९६० च्या दशकात सुरू झाली. ग्राहक संघटना, सामाजिक कार्यकर्ते आणि अभ्यासकांनी ग्राहक संरक्षणासाठी व्यापक जनजागृती केली. या चळवळीचा सर्वात मोठा टप्पा म्हणजे ग्राहक संरक्षण कायदा १९८६ ( १९८६ ) हा कायदा. या कायद्यामुळे ग्राहकांना न्याय मिळवण्यासाठी जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर ग्राहक न्यायालयांची व्यवस्था करण्यात आली.

यानंतर बदलत्या बाजारपेठेच्या गरजेनुसार भारत सरकारने ग्राहक संरक्षण कायदा ( २०१९ ) लागू केला. या कायद्यामुळे ई-कॉमर्स व्यवहार, भ्रामक जाहिराती आणि ऑनलाइन व्यापार यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नवीन तरतुदी करण्यात आल्या.ऑनलाइन वस्तू मागवली पण वस्तू मिळाली नाही,चुकीची वा निकृष्ट वस्तू मिळाली,

पैसे घेतले पण सेवा दिली नाही,भ्रामक ऑनलाइन जाहिरात करून ग्राहक फसवला, ई-कॉमर्स कंपनीने रिफंड दिला नाही,आदी सर्व तक्रारी ग्राहक संरक्षण कायदा अंतर्गत करता येतात.तसेच ग्राहकांच्या तक्रारींचे जलद निवारण करण्यासाठी तीन-स्तरीय ग्राहक आयोग व्यवस्था कार्यरत करण्यात आली आहे.

**भारतातील ग्राहक दिन**

जागतिक पातळीवर १५ मार्च हा ग्राहक दिन आहे. तर भारतामध्ये २४ डिसेंबर हा 'राष्ट्रीय ग्राहक दिन' म्हणून साजरा केला जातो. कारण २४ डिसेंबर १९८६ रोजी ग्राहक संरक्षण कायद्याला राष्ट्रपतींची मंजुरी मिळाली. या दिवशी ग्राहक हक्कांविषयी जनजागृती कार्यक्रम आयोजित केले जातात.

महाराष्ट्रातील ग्राहक चळवळ उभारण्यात प्रामुख्याने बिंदू माधव जोशी,स्वातीताई शहाणे, बापूसाहेब महाशब्दे यांच्यासह विविध संघटनांनी योगदान दिले. त्यांनी ग्राहक हक्कांसाठी विविध संघटना उभारून जनजागृती, कायदेशीर लढाया आणि संशोधनकार्य केले.

**महाराष्ट्र शासनाची भूमिका**

महाराष्ट्र शासनाने अन्न व नागरी पुरवठा हे एक मंत्रालय निर्माण केले आहे. त्या अंतर्गत ग्राहक संरक्षणासाठी स्वतंत्र ग्राहक संरक्षण विभाग, राज्य व जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद, राज्य व जिल्हा ग्राहक आयोग,( जिल्हा ग्राहक न्यायालय )राज्य ग्राहक आयोग, आणि ग्राहक संघटनांनी ग्राहक मार्गदर्शन केंद्रे सुरू केली आहेत. जिल्हा ग्राहक न्यायालयाच्या मार्फत राज्यात ग्राहक जनजागृतीसाठी ग्राहक तक्रार निवारण केंद्रे, तसेच शालेय-महाविद्यालयीन स्तरावर ग्राहक शिक्षण कार्यक्रम राबवले जातात. ५० लाखांपर्यंतच्या फसवणुकीसाठी जिल्हास्तरावरच ग्राहकांना याचिका दाखल करता येते आणि जिल्हा ग्राहक न्यायालयाकडून या संदर्भात न्याय दिला जाते. याशिवाय ५० लाख ते दोन कोटी पर्यंत राज्य व त्या पुढच्या रकमेसाठी केंद्रीय जिल्हा ग्राहक आयोगात खटलात चालवला जाऊ शकतो. जिल्हा पुरवठा अधिकारी जिल्हा स्तरावर ग्राहकांच्या संदर्भातील अनेक समित्यांचे सदस्य सचिव म्हणून काम बघतात त्यांच्यामार्फत ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठका आयोजित केल्या जातात.

त्यामुळे सध्या बाजारातील हालचाली बघता जागतिक ग्राहक दिन हा केवळ एक स्मरणदिन नसून ग्राहक सक्षमीकरणाचा संदेश देणारा दिवस आहे. बाजारपेठेतील अन्यायकारक पद्धतींना आळा घालण्यासाठी ग्राहक जागरूक असणे आवश्यक आहे. शासन, ग्राहक संघटना आणि समाज यांच्या संयुक्त प्रयत्नांतूनच ग्राहकांचे हित सुरक्षित राहू शकते. म्हणूनच १५ मार्चचा दिवस आपल्याला ग्राहक म्हणून आपल्या अधिकारांची जाणीव करून देतो आणि न्याय्य व पारदर्शक बाजारपेठ निर्माण करण्यासाठी प्रेरणा देतो.

**प्रवीण टाके**
**उपसंचालक**
**विभागीय माहिती कार्यालय**
**कोल्हापूर**
**९७०२८५८७७७**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### लव्ह जिहाद, धर्मांतर आणि लोकसंख्या विषयावर रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराजांची भूमिका

दैनिक आपला विदर्भ




**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** लव्ह जिहाद, धर्मांतर, लोकसंख्या नियंत्रण तसेच शिक्षण व्यवस्थेत भारतीय संस्कृतीचा समावेश यांसारख्या विविध मुद्द्यांवर रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज यांनी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित पत्रकार परिषदेत आपली भूमिका मांडली. धर्मांतराच्या मुद्द्यावर बोलताना त्यांनी सांगितले की, हिंदू समाजातील मुलींना फसवून धर्मांतर घडवून आणण्याच्या घटना रोखण्यासाठी कठोर कायदे करण्याची गरज आहे. हिंदू मुलींनी इतर धर्मातील मुलांशी विवाह केल्यानंतर त्यांचा किंवा त्यांच्या मुलांचा धर्म बदलू नये, असा कायदा करण्यात आल्यास धर्मांतराला आळा बसू शकतो, असेही त्यांनी मत व्यक्त केले. भारताच्या जागतिक स्थानाबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, भारतीय संस्कृती आणि परंपरा जगाला आकर्षित करत असून भारत भविष्यात 'विश्वगुरु' म्हणून पुढे येईल. कोणताही राजकीय पक्ष धर्माला एकत्र करू शकत नाही; मात्र हिंदू धर्मगुरू समाजाला संघटित करण्याचे कार्य करत असल्याचे त्यांनी नमूद केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी लोकसंख्येबाबत केलेल्या विधानाचे समर्थन करताना नरेंद्राचार्य महाराज म्हणाले की, देशाच्या हितासाठी कुटुंब नियोजनाबाबत योग्य धोरण असणे आवश्यक आहे. पूर्वी हिंदू समाजात मोठ्या कुटुंबांची परंपरा होती, असेही त्यांनी सांगितले. शैक्षणिक क्षेत्राबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये भारतीय संस्कृती व हिंदू इतिहास अधिक प्रमाणात शिकवला गेला पाहिजे. तसेच मदरसा आणि ख्रिश्चन शाळांना जशा अनुदानाच्या योजना आहेत, त्याचप्रमाणे वेदविद्वान शिक्षण देणाऱ्या संस्थांनाही शासनाने अनुदान द्यावे, अशी मागणी त्यांनी केली. यावेळी त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन समितीवरही टीका करत आपल्याला कोणत्याही धर्माचा विरोध नसून चुकीच्या प्रवृत्तींचा विरोध असल्याचे स्पष्ट केले. आंतरराष्ट्रीय घडामोडींवर भाष्य करताना त्यांनी इराण-इस्रायल संघर्षाचा उल्लेख केला आणि जागतिक राजकारणात महासत्तांमधील शक्तीप्रदर्शनामुळे अशा संघर्षांना चालना मिळत असल्याचे मत व्यक्त केले.

# लोणार तालुक्यातील हिरडव येथे महाराजस्व समाधान शिबिराचं केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले उद्घाटन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शासनाच्या विविध योजनेचा लाभ सहजपणे ,शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्यासाठी राज्य सरकारच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात येत आहे .या अभियानाचा लाभ ग्रामीण जनतेने घ्यावा असे आवाहन केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केले

सामान्य जनतेच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि शासकीय योजनांचा लाभ एकाच छताखाली मिळवून देण्यासाठी बुलडाणा जिल्ह्यातील अतिदुर्गम भागात असलेल्या लोणार तालुक्यातील हिरडव येथे आज १४ मार्च रोजी महाराजस्व समाधान शिबिर आयोजित करण्यात आले होते . या अभियानाचे उद्घाटन केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव हस्ते झाले त्यावेळी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते यावेळी व्यासपीठावर माजी आमदार संजय रायमुलकर





तहसीलदार भूषण पाटील शिवसेना जिल्हाप्रमुख डॉ मापारी उपस्थित होते केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज जे अर्ज स्वीकारले आहे त्यावर तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी दिले. प्रशासनातील अधिकाऱ्यांनी साहेबी थाट बाजुला सारून जनतेचे काम करावे .. तुम्ही आम्ही जनतेचे सेवक आहोत जनतेच्या हिताचे कामे वेळेचे आत पूर्ण करून देण्याचे निर्देशित त्यांनी यावेळी दिले ...या शिबिरात महसूल विभागासह इतर १५ हून अधिक विभागांच्या सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

* महसूल सेवा: डिजिटल ७/१२, ८अ वाटप आणि फेरफार प्रकरणांचा निपटारा.
* शासकीय दाखले: उत्पन्न, जात आणि रहिवासी दाखल्यांचे त्वरित वितरण.
* आरोग्य आणि कल्याण: आभा () कार्ड आणि आयुष्मान भारत कार्डांचे प्रत्यक्ष वाटप.
* शेतकरी योजना: पीएम किसान ई-केवायसी (-) आणि युनिक फार्मर आयडी निर्मिती.आदींचा समावेश आहे यावेळी मंत्री महोदयांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्रमाणपत्र आणि लाभ वाटप करण्यात आहे.

### रेणुकाबाईच्या घराचा प्रश्न मार्गी लावण्याचे मंत्री महोदयांनी दिले निर्देश

शिबिरातील स्टॉलला भेटी देत असताना लोणार तालुक्यातील वढव येथील रेणूकाबाई फड यांनी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडे घर नसल्यांची कैफियत मांडली त्यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी सदरहू महिलेकडे घर बांधण्यासाठी जागा नसल्याचे सांगितले यावर मंत्री महोदयांनी अधिकाऱ्यांना सांगितले की पंडित दीनदयाळ योजनेअंतर्गत १ लाख रुपये जागा घेण्यासाठी मिळतात. त्या पैशातून सदरहू महिलेला जागा घेवुन द्या आणि घरकुल योजनेत घर बांधण्यासाठी मदत करा असे ही निर्देश यावेळी दिलेत. मंत्री महोदयांनी दखल घेऊन अधिकाऱ्यांनाच काम करण्याची निर्देश दिल्यामुळे रेणूकाबाईच्या चेहऱ्यावर हास्य फुलल ...

### वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाला स्वायतत्ता देण्यासाठी समिती स्थापन

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज. जी. समूह रुग्णालय तसेच नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय या संस्थांना स्वायत्तता देण्यासंदर्भात सविस्तर धोरणात्मक आराखडा तयार करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली. या समितीच्या अध्यक्षपदी राज्याचे माजी मुख्य सचिव जयंत कुमार बांठिया यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यासंदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने शासन निर्णय जारी केला आहे. स्वायत्ततेच्या माध्यमातून राज्यातील प्रमुख शासकीय वैद्यकीय संस्थांची शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन क्षमता आणि आरोग्यसेवा अधिक प्रभावी करण्याचा शासनाचा उद्देश असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

समितीत टाटा मेमोरिअल रुग्णालयाचे माजी संचालक डॉ. राजेंद्र बडवे, के.ई.एम. रुग्णालयाचे माजी संचालक डॉ. संजय ओक, ग्रॅन्ट वैद्यकीय महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रणजीत माणकेश्वर, बै. जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय पुणे येथील प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. राजेश कार्यकर्ते, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलसचिव यांचा सदस्य म्हणून समावेश आहे. तसेच महाराष्ट्र वैद्यक परिषदेचे प्रबंधक हे समितीचे सदस्य सचिव असतील.

# लोणार सरोवर विकास कामाला वेग देण्याच्या सुचना: विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंगल यांनी केली पाहणी

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जगप्रसिद्ध लोणार सरोवराच्या जतन-संवर्धनासोबत पर्यटनविकासाला गती देण्याच्या दृष्टीने अमरावती विभागाच्या विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंगल यांनी लोणार येथे प्रत्यक्ष पाहणी केली. या भेटीत त्यांनी लोणार विकास आराखड्यांतर्गत सुरू असलेल्या कामांची सविस्तर माहिती घेत गुणवत्ता, पारदर्शकता आणि वेळेचे नियोजन यांवर भर देण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना दिले. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या समवेत त्यांनी परिसराची पहाणी केली. सोबतच लोणार विकास आराखड्यासंदर्भाने एक बैठकही त्यांनी घेत सर्वंकष आढावा घेतला.

सरोवर परिसरातील सुरू असलेल्या बांधकामे, पायाभूत सुविधा आणि सौंदर्यीकरणाच्या कामांचा आयुक्तांनी प्रत्यक्ष आढावा





घेतला. लोणारचा विकास आराखडा हा पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याने कामे निर्धारित कालावधीत पूर्ण करण्याबाबत त्यांनी वन विभाग, नगर परिषद आणि महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

दौऱ्यादरम्यान आयुक्तांनी लोणारमधील ऐतिहासिक झोपलेल्या मारुती मंदिराचे दर्शन घेतले. यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिकांच्या शिष्टमंडळाने त्यांची भेट घेऊन काही प्रलंबित प्रश्नांकडे लक्ष वेधले. गायमुख धार पुन्हा धार्मिक स्नानासाठी खुली करण्याची मागणी, सरोवरातील पाण्याची वाढती पातळी लक्षात घेऊन गोड्या पाण्याचा नियंत्रित उपसा करण्याचा प्रस्ताव, लोणारमधील प्राचीन मंदिरांना जोडून स्वतंत्र तीर्थक्षेत्र विकास आराखडा तयार करण्याची मागणी तसेच शहराच्या सौंदर्यीकरणासाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याचा मुद्दा यावेळी मांडण्यात आला. या मागण्यांबाबत तांत्रिक बाबी तपासून आवश्यक त्या पातळीवर कार्यवाही करण्याचे आश्वासन आयुक्तांनी दिले.

या पाहणी दौऱ्यात विभागीय वन अधिकारी (वन्यजीव, अकोला) यशवंत नागुलकर, सहाय्यक वनसंरक्षक चेतन राठोड, उपविभागीय अधिकारी राजेंद्र जोगी, तहसीलदार भूषण पाटील, नगराध्यक्षा मीरा मापारी, मुख्याधिकारी बोबडे तसेच पुरातत्त्व विभागाचे प्रतिनिधी व नगर परिषदेचे अभियंते उपस्थित होते.

लोणार सरोवराचा अद्वितीय नैसर्गिक वारसा जपत पर्यटनविकासाच्या माध्यमातून स्थानिकांना रोजगारनिर्मितीच्या संधी उपलब्ध करून देण्यावरही प्रशासनाने भर द्यावा, असे निर्देश यावेळी देण्यात आले.

## शब्दकोडे क्र. 81

आडवे शब्द

१. कातीव दगड ३. नेहमी पटकन विसरणारा ६. वाडवडील १०. आरडाओरडा, दंगा १२. दोस्त १३. व्याह्यांची बायको १४. अयोध्येची नदी १६. दाट, निबीड १८. पृथ्वी २०. उत्साह २१. हे खाऊन रूप येते का? २३. किडा २५. वाईट सवय २७. अस्थी २९. अंत:करण ३१. पराक्रमी पुरुष ३२. आदरणीय ३३. दरवाजा ३५. कापड इ.चा पृष्ठभाग ३६. तृण ३८. आच, उष्णता ३९. घर ४०. मातीच्या भांड्याचा तुकडा ४१. वरणाची दाळ ४२. निर्दय ४३. उद्यान ४४. जवळीक, मैत्री ४७. स्वीकृत, अंगीकृत ५०. अप्रिय, न आवडणारा ५१. सुळका ५१अ. अफवा, वदंता ५२. बालीश ५४. भगिनी ५५. पुष्कळ ५७. तंग ५८. क्रीडा ५९. वेखंड ६०. कुरडईच्या जोडीने तळला जाणारा पदार्थ ६१. बाण ६३. बंध ६४. विलंब ६५. टिंगल ६६. कायद्याला या हजार असतात! ६९. चकित नजर ७१. लाह्यांचा होम ७४. बासरी ७५. चुलता ७७. उणे ७८. न टाळण्याजोगे ७९. बरोबरीचा ८०. शर्विलक ८१. झेप ८३. घोडा ८४. पुष्पगुच्छ ८५. खेळातील चाल ८६. आईचा भाऊ ८७. गगन ८८. रहायला घर नसलेला

उभे शब्द

१. दिवा (हिंदी)२. वेडावाकडा४. यज्ञातील सरपण ५. निशा ६. अस्तनी ७. नातवंडाचा मुलगा ८. राष्ट्र ९. वारा १०. डिंक ११. ताजे, तरतरीत १३. स्वच्छ, निर्मळ १५. रूधिर १७. फांदी १९. सेपे २२. डोंगर २४. मसाल्याच्या पदार्थातील एक २६. धीर, बळ, उत्साह २८. व्याकूळ, व्याकूळ करणारे २९. बंदुकीची गोळी ३०. विश्व ३४. गंध, परिमळ ३५. एक 'बोलका' पक्षी ३७. रंग ३८. अटकसत्र ३९. कोडगा ४०. संसद सदस्य ४३. वक्रता ४५. मीठ ४६. वार्धक्य ४८. भेग ४८अ. उगाळलेल्या औषधाचा ओढा ४९. आगेकूच ५०. '... म्हणते रे गीत, परि सारे हलक्याने, आड येते रीत' ५२. पोळ्या करण्याचे साधन ५३. मिठी ५४. नोकर ५७. गृह ६१. लाज ६२. परिचय ६५. सूत कातण्याचे साधन ६७. आक्रोश ६८. हट्ट ७०. घट्ट दह्याची वडी ७२. अग्नी ७३. रगेल, माजखोर ७६. चोळीचा एक प्रकार ८१. पार्वती ८२. एक अप्सरा ८३. सध्या संकटात सापडलेला वन्य प्राणी


### शब्दकोडे क्र. 80 चे उत्तर

आडवे उत्तर

१.तांब्या ३.सालाबादप्रमाणे ७.पसायदान १०.बदनामी १२.कीर १४.वलय १६.वाफ १७.पटाव १९.विलाप २१.मोड २१अ.जबान २२.काकी २३.शत्रुघ्न २५.गज २६.उमाळा २७.वावटळ २८.अन्य २९.वडील ३१.राजी ३३.भेजा ३४.टग्या ३५.पत ३६.परवानगी ३८.तस्त ४०.वाटप ४२.सौर ४३.राख ४४.रंक ४५.केशव ४६.बटीक ४७.वग ४९.वाहवा ५२.बंडलबाज ५४.रघुवीर ५८.यार ६०.गादी ६१.थाबा ६३.वजन ६५.अंगद ६७.म्यान ६८.विनाशकाले ७१.ठाव ७३.काक ७४.कमनीय ७७.जमीन ७९.अनावर ८१.गरुड ८२.गोरा ८३.गगन ८५.तरुणपण ८६.केली ८८.सागर ८९.थक्क ९०.नाद ९१.नड

उभे उत्तर

१.तांबडा २.ब्याद ३.सामील ४.बाकी ५.दरवाजा ६.मान्य ८.साठा ९.दाखला ११.नावड १३.लाट १५.यजमान १७.पाकीटमार १८.वश १९.विघ्न २०.पर्जन्य २१.मोजडी २२.बाळा २२अ.काव २४.त्रुटी २५.गवगवा २७.वाजी २८.अजातशत्रू ३०.लटपटीत ३१.रात ३२.जनक ३५.परवड ३६.पखवाज ३७.वारंवार ३९.स्तव ४१.टब ४८.गलथान ५०.दैवी ५१.जयाअंगी ५२.बंदी ५३.बाबा ५५.घुटका ५६.रव ५७.मौन ५९.रग ६२.विनाकारण ६४.जननी ६६.दशमी ६७.म्याव ६९.शठ ७०.लेकरू ७२.कनात ७५.मडके ७६.यथा ७७.जरासा ७८.नगर ८०.वरुण ८१.गणना ८४.नथ ८७.लीन



वृत्तविशेष...

## कॉलेजला जाते म्हणत घरातून निघालेली पांगरखेडची तरुणी बेपत्ता; डोणगाव पोलिसांत नोंद

**दैनिक आपला विदर्भ**

**डोणगाव/प्रतिनिधी :** डोणगाव पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या पांगरखेड येथील २० वर्षीय तरुणी कॉलेजला जाते असे सांगून घरातून निघाली; मात्र ती महाविद्यालयात पोहोचलीच नसल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी डोणगाव पोलीस ठाण्यात हरवल्याची नोंद करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पांगरखेड (ता. मेहकर) येथील रहिवासी प्रियंका विलास नालिंदे (वय २० वर्षे) ही तरुणी हिवरा आश्रम येथे शिक्षण घेत आहे. २७ फ ेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी सुमारे ११ वाजता ती ''मी कॉलेजला जाते'' असे सांगून घरातून निघाली. मात्र सायंकाळपर्यंत ती घरी परतली नाही. कुटुंबीयांनी तिच्या मोबाईलवर अनेकदा संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; परंतु सुरुवातीला फोन उचलला गेला नाही आणि त्यानंतर मोबाईल बंद येऊ लागला. मुलगी घरी न परतल्याने चिंतेत पडलेल्या कुटुंबीयांनी हिवरा आश्रम येथील तिच्या कॉलेजच्या वसतिगृहात जाऊन चौकशी केली. त्यावेळी वसतिगृह प्रशासनाने सांगितले की, प्रियंकाने ''मी आजारी आहे'' असा रजेचा अर्ज दिला होता आणि ती १४ फेब्रुवारी २०२६ पासून वसतिगृहात आलेलीच नव्हती. ही माहिती समोर आल्यानंतर कुटुंबीयांच्या पायाखालची जमीन सरकली. त्यानंतर वडिलांनी तिच्या मैत्रिणी, वर्गमित्र, नातेवाईक आणि ओळखीच्या लोकांकडे सर्वत्र शोध घेतला; मात्र तिचा कुठेही पत्ता लागला नाही. अखेर प्रियंकाचे वडील विलास मधुकर नालिंदे यांनी डोणगाव पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी हरवल्याची नोंद केली आहे. हरवलेल्या तरुणीचा रंग गोरा, उंची सुमारे ५ फ ूट, बांधा सडपातळ असून तिने अंगात पांढऱ्या रंगाचा (भुरकट नक्षीकाम असलेला) पंजाबी ड्रेस परिधान केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार सोनुने करीत आहेत. वरील वर्णनाची तरुणी आढळून आल्यास किंवा तिच्याबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास तातडीने डोणगाव पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## १ एप्रिलपासून मर्सिडीज-बेंझच्या कार किमतीत २ टक्क्यांची होणार वाढ

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** जर्मनीची प्रसिद्ध लक्झरी कार निर्माता कंपनी मर्सिडीज-बेंझने भारतीय बाजारातील ग्राहकांसाठी एक महत्त्वाची घोषणा केली आहे. कंपनीने १ एप्रिल २०२६ पासून भारतातील आपल्या संपूर्ण वाहन पोर्टफोलिओच्या किमतीत सुमारे २ टक्क्यांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. वाढत्या खर्चामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे.

कंपनीच्या मते, परकीय चलन विनिमय दरातील सतत होणारे चढउतार आणि कच्च्या मालाच्या वाढत्या किमतीमुळे उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली आहे. याशिवाय युरोच्या तुलनेत भारतीय रुपयाचे अवमूल्यन झाल्यामुळे कंपनीच्या एकूण परिचालन खर्चावरही मोठा परिणाम झाला आहे. त्यामुळे व्यवसायाची दीर्घकालीन स्थिरता टिकवून ठेवण्यासाठी किमतीत बदल करणे आवश्यक झाल्याचे कंपनीने सांगितले.

मर्सिडीज-बेंझ इंडियाचे विक्री आणि विपणन उपाध्यक्ष ब्रेंडन सिसिंग यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, कंपनी शक्य तितक्या प्रम ाणात वाढलेल्या खर्चाचा भार स्वत: उचलण्याचा प्रयत्न करत असते. मात्र सध्याच्या परिस्थितीत व्यवसाय टिकवून ठेवण्यासाठी किंमतीत सुधारणा करणे गरजेचे झाले आहे. त्यामुळे १ एप्रिलपासून सर्व मॉडेल्सच्या किमतीत सरासरी २ टक्क्यांची वाढ लागू केली जाणार आहे.

या निर्णयाचा परिणाम कंपनीच्या सर्व म ॉडेल्सवर होणार आहे. भारतात असेंबल केल्या जाणाऱ्या गाड्यांपासून ते पूर्णपणे आयात केल्या जाणाऱ्या लक्झरी कारपर्यंत सर्व वाहनांच्या किम तीत ही वाढ लागू होईल. मात्र ग्राहकांवर त्याचा परिणाम कमी व्हावा यासाठी ही वाढ अत्यंत काळजीपूर्वक लागू केली जाईल, असेही कंपनीने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, लक्झरी कार बाजारात किमती वाढवण्याचा हा निर्णय केवळ मर्सिडीज-बेंझपुरता मर्यादित नाही. याआधी जर्मनीचीच आणखी एक मोठी वाहन निर्माता कंपनी ऑडीने देखील भारतातील आपल्या सर्व मॉडेल्सच्या किमती १ एप्रिल २०२६ पासून सुमारे २ टक्क्यांनी वाढवण्याची घोषणा केली आहे. वाढती इनपुट कॉस्ट आणि चलन विनिमय दरातील अस्थिरता हेच या निर्णयाम ागचे प्रमुख कारण असल्याचे कंपनीने सांगितले आहे. लक्झरी वाहनांच्या बाजारात मागणी कायम असली तरी उत्पादन खर्च वाढत असल्याने वाहन कंपन्यांना किंमतवाढीचा मार्ग स्वीकारावा लागत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. त्यामुळे येत्या काळात लक्झरी कार बाजारात अशा प्रकारच्या किंमतवाढीचे निर्णय आणखी कंपन्यांकडून घेतले जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# मातोश्री येथे पार पडला शिवसेना पक्षप्रवेश सोहळा

## बुलडाणा विधानसभा मतदारसंघातील शेकडो कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश संपन्न

**दैनिक आपला विदर्भ**





**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील मोताळा व बुलडाणा तालुक्यातील विविध गावांतील सरपंच, माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांनी मुंबई येथे आज दि.१४/०३/२०२६ रोजी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षात प्रवेश केला. पक्षप्रमुख मा.उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून मातोश्री येथे आयोजित कार्यक्रमात बुलडाणा जिल्ह्यातील अनेक कार्यकर्त्यांनी अधिकृतरित्या पक्षात प्रवेश करत पक्ष बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला. शिवसेना प्रवक्ता ॲड.जयश्रीताई शेळके आणि जिल्हाप्रमुख जालिंधर बुधवत यांच्या नेतृत्वात या मोठ्या पक्षप्रवेशाने जिल्ह्यातील पक्षाची ताकत वाढली असल्याची भावना यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

या पक्षप्रवेशात मोताळा तालुक्यातील अंत्री येथील सरपंच मीराताई कैलास बहादरे, अशोकदादा पाटील (शिक्षण संस्था अध्यक्ष, वडणी चिंचखेड खु.), सुभाषभाऊ रघुनाथ पाटील (ग्रामपंचायत सदस्य, लिहा), अक्षयभाऊ नाईक (ग्राम सदस्य, गिरोली), वैभवभाऊ उखा चव्हाण (सभापती पुत्र, दाभा), सुरेशभाऊ राठोड (माजी ग्रा.पं.सदस्य, निमखेड), काशिनाथभाऊ शामराव बिचकुले (सामाजिक कार्यकर्ता, धा. देशमुख), मुरलीभाऊ सातव (ग्रा. पं.सदस्य, जयपूर), अक्षयभाऊ मधुकर जवरे (सामाजिक कार्यकर्ता, अंत्री), गणेशभाऊ गजानन शेळके (सामाजिक कार्यकर्ता, तिघ्रा ), विजयभाऊ पुंडलिक खराटे (सामाजिक कार्यकर्ता, लिहा), सागरभाऊ मेढे (सामाजिक कार्यकर्ता, परडा), गोपालभाऊ दिवाणे (सामाजिक कार्यकर्ता, शिरवा), मिलिंदभाऊ मनोहर गवई (सामाजिक कार्यकर्ता, चिंचपूर), श्रीकृष्णभाऊ घोंगटे (सामाजिक कार्यकर्ता, आव्हा), भारतभाऊ पांडू राठोड (सामाजिक कार्यकर्ता, नाईकनगर), चेतनभाऊ हिंगे (सामाजिक कार्यकर्ता, मोताळा), मोहन चव्हाण (ग्रा.पं.सदस्य, निमखेड) जयंतभाऊ व्यवहारे पाटील (सामाजिक कार्यकर्ता, योगेशभाऊ पैसोडे (सामाजिक कार्यकर्ता, अंत्री), संगीताताई कोळसे (सामाजिक कार्यकर्त्या, अंत्री) प्रियंकाताई मुकुंदा क्षिरसागर (धा.बढे), कविताताई रामशंकर सोनुने (धा.बढे), ज्ञानेश्वर सुरडकर (सामाजिक कार्यकर्ते, अंत्री) योगेशभाऊ सुभाष महाजन (सामाजिक कार्यकर्ते लिहा. बु.) आदींसह अनेक कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केला.

तसेच बुलडाणा तालुक्यातील गणेशराव उत्तमराव रिंढे (ग्रामपंचायत सदस्य, तांदळुवाडी), सिद्धार्थभाऊ शंकर खरे (माजी उपसरपंच, तांदळुवाडी), सुनीलभाऊ यशवंत रिंढे (ग्रामपंचायत सदस्य, तांदळुवाडी), विठ्ठलभाऊ पुंडलिक लांडगे (माजी ग्राम सदस्य, तांदळुवाडी), सुरेशभाऊ पंजाबराव रिंढे (समाजसेवक, तांदळुवाडी), योगेशभाऊ शेषराव रिंढे (समाजसेवक, तांदळुवाडी), सुरेशभाऊ बाबुराव रिंढे (माजी ग्रा. पं.सदस्य, तांदुळवाडी), सुरेशभाऊ काशिकर (सामाजिक कार्यकर्ते, तांदुळवाडी), दिपकभाऊ शेनफड रिंढे, (माजी सरपंच, तांदुळवाडी), योगेश शेषराव रिंढे (सामाजिक कार्यकर्ते), दगडुभाऊ तेजराव शेळके (सामाजिक कार्यकर्ते, सव), आनंताभाऊ माधवराव शेळके (सामाजिक कार्यकर्ते, सव), शालिग्रामभाऊ जवंजाळ (सामाजिक कार्यकर्ते, सव), दिलिपभाऊ शेळके (सामाजिक कार्यकर्ते, सव), दिलिपभाऊ पवार (ग्रा.पं.सदस्य, सव), ज्ञानेश्वरभाऊतायडे (सामाजिक कार्यकर्ते, अंत्री तेली), सतिषभाऊ नारायण शेळके (ग्रा.पं.सदस्य, सव), सुनिलभाऊ आत्माराम बाहेकर (सामाजिक कार्यकर्ते, सव), विजयभाऊ डुकरे (सामाजिक कार्यकर्ते, खुपगाव), रुस्तुमभाऊ भगवान शेळके (सामाजिक कार्यकर्ते, सव), कृष्णाभाऊ तुकाराम पंडीत (सामाजिक कार्यकर्ते, सव), सुखदेवभाऊ सुरडकर (सामाजिक कार्यकर्ते, सव), शालिग्रामभाऊ शेळके (सामाजिक कार्यकर्ते, सव) आदींसह अनेक ग्रामपंचायत सदस्य, समाजसेवक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी पक्षप्रवेश केला.

याशिवाय वसंतराव गोविंदराव इंगळे (माजी तंटामुक्ती अध्यक्ष व माजी ग्राम सदस्य, डोंगरखंडाळा), संतोषभाऊ अवचितराव इंगळे (ग्रामपंचायत सदस्य, डोंगरखंडाळा), सोपानभाऊ बळीराम चव्हाण (माजी ग्राम सदस्य, डोंगरखंडाळा), सुभाषभाऊ देवसिंग राठोड (माजी ग्राम सदस्य, डोंगरखंडाळा), गजाननभाऊ राजाराम इंगळे (सामाजिक कार्यकर्ता, डोंगरखंडाळा), सुभाषभाऊ उत्तम काकडे (सामाजिक कार्यकर्ता, डोंगरखंडाळा), राजूभाऊ पवार (माजी ग्रा.पं.सदस्य, डोंगरखंडाळा), जगदिशभाऊ वानखेडे (सामाजिक कार्यकर्ते, डोंगरखंडाळा), कैलासभाऊ सावळे (सामाजिक कार्यकर्ते, डोंगरखंडाळा), अशोकभाऊ सावळे (सामाजिक कार्यकर्ते, डोंगरखंडाळा), मधुकरभाऊ चव्हाण (सामाजिक कार्यकर्ते, डोंगरखंडाळा) यांचाही पक्षप्रवेश झाला.

महिला कार्यकर्त्यांमध्ये अनिताताई गायकवाड (माजी सरपंच, करणखेड), शोभाताई रिंढे (माजी सरपंच, तांदळुवाडी), मीराबाई कैलास बहादरे (सरपंच, अंत्री), सुनीताताई गायकवाड मा . ग्रा. पं. सदस्य, भावनाताई पाटील (उद्योजिका, बुलडाणा), संगीताताई कोळसे अंत्री , अनुश्रीताई जाधव, प्रियंकाताई क्षीरसागर, रत्नाताई शेळके, अर्चनाताई शेळके, स्मिताताई वराडे, शुभांगीताई बाहकेर, गोदावरीताई काळे, सुनंदाताई खरात आदींचाही समावेश आहे.

या प्रवेश सोहळ्यासाठी मा. विनायकजी राऊत साहेब, जिल्हा संपर्कप्रमुख नरुभाऊ खेडेकर जिल्हाप्रमुख जालिंदर भाऊ बुधवत, गजाननभाऊ वाघ, जिल्हा समन्वयक डी. एस लहाने, उपजिल्हाप्रमुख आशिषदादा रहाटे, महिला आघाडी जिल्हा प्रमुख विजयाताई खडसान यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते!

## पेंच वन्यजीव क्षेत्रातील ४० ठिकाणचे अलर्ट मिळणार

**नागपूर/प्रतिनिधी :** रामटेक तालुक्यातील देवलापार हे आदिवासी बहुलक्षेत्र आणि विशेषतः पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या पंचक्रोशित असलेले गाव. याच्या शेजारी पिपरिया नावाचे छोटेसे गाव. वाघांच्या डरकाळ्या व संचार या गावात तसा नवा नाही. वेळोवेळी पाळीव प्राण्यांसह या गावात माणसांवरही जीवघेणे हल्ले झाले आहेत. यातून माणसाच्या जीवांना वाचविण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलीस व वन विभागाने अभिनव उपाययोजनांवर विचार सुरु केला. यातून एआय आधारित प्रकल्पाने आकार घेतला. याची फलश्रुती म्हणून तीन ठिकाणी ही यंत्रणा कार्यान्वित होऊन संवेदनशील ठिकाणांवर गावकऱ्यांना वाघ आणि बिबट्यांचा वावर असल्याचे सतर्कतेचे इशारे मिळू लागले आहेत. गुरुवारी रात्री या यंत्रणेकडून देवलापारजवळील पिपरिया येथे वाघाचा वावर असल्याचा इशारा गावकऱ्यांना आणि वन विभागाला मिळाला आणि गावकरी सतर्क झाले.

विशेष म्हणजे येत्या १५ एप्रिलपर्यंत वनविभागाचे पेंच वन्यजीव क्षेत्र तसेच प्रादेशिक क्षेत्र मिळून संवेदनशील स्वरुपाच्या ४० गावांमध्ये ही यंत्रणा स्थापित होऊन कार्यान्वित होणार आहे.

नागपूर ग्रामीण भागात मागील अडीच ते तीन वर्षांच्या कालावधीत वाघ किंवा बिबट्याच्या हल्ल्यात गावकऱ्यांचा मृत्यू होण्याच्या १५ घटना घडल्या आहेत. यापैकी अनेक घटनांमध्ये गावकऱ्यांमध्ये रोष निर्माण होऊन कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यावर उपाय म्हणून वन विभाग आणि नागपूर ग्रामीण पोलिसांनी 'एआय' आधारित (कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित) उपाययोजना सुरु केल्या आहेत. राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये एआय तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यात योगदान देणाऱ्या मार्व्हल या संस्थेच्या वतीने 'एआय' आधारित यंत्रणा उभारण्यात येत आहे. नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार हे मार्व्हल संस्थेचे सीईओ देखील आहेत. पोलीस अधीक्षक पोद्दार यांनी सांगितले की, मागील दोन ते तीन वर्षात घडलेल्या घटनांमध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याचे पहायला मिळाले. त्यावर उपाय म्हणून आम्ही 'एआय' तंत्रज्ञानाचा वापर सुरु केला आहे. गावाच्या परिसरात वाघ, बिबटे, अस्वल या सारख्या आक्रमक प्राण्यांचा परिसरात वावर असल्यास सतर्कतेचा इशारा देणाऱ्या 'एआय' तंत्रज्ञानावर मार्व्हलने काम केले. त्याअंतर्गत विशिष्ट ठिकाणांवर उच्च क्षमतेचे अत्याधुनिक कॅमेरे बसविण्यात आले आहेत. हे तंत्रज्ञान 'बायो ॲक्यूस्टिक्स' (ध्वनी आधारित) आणि 'बायो व्हिज्युअल' (प्रत्यक्ष दृष्य आधारित) अशा दोन प्रकारे काम करते. वाघ किंवा बिबटे परिसरात आल्यास चितळ, सांबर, माकड यासारखे तृणभक्षी प्राणी आणि मोर विशिष्ट प्रकारचे आवाज काढून संपूर्ण परिसराला सतर्क करतात. ते विशिष्ट आवाज टिपून हे 'एआय' तंत्रज्ञान डेटाचे विश्लेषण करुन त्यासंबंधीचे सतर्कतेचे इशारे संबंधितांना पाठविण्याचे कार्य करते. सतर्कतेचे इशारे वन विभागाचे अधिकारी व गावकऱ्यांना त्यांच्या मोबाईल फोनवर मिळू शकतात. याशिवाय 'बायो व्हिज्युअल' प्रकारच्या तंत्राच्या माध्यमातून कॅमेरात प्रत्यक्ष प्राण्याचे फोटो 'कॅप्चर' झाल्यास हे तंत्रज्ञान सतर्कतेचे इशारे पाठवते.

पोलीस अधीक्षक पोद्दार यांनी सांगितले की, वन विभागाच्या मदतीने आम्ही वन्यप्राण्याच्या हल्ल्यांच्या दृष्टीने संवेदनशील अशा ४० ठिकाणांची निवड केली असून तेथे प्राधान्याने कॅमेरे लावण्यात आले आहेत. याच आठवड्यात तब्बल तीन ठिकाणी ही यंत्रणा प्रत्यक्षात कार्यान्वितही झाली असून मागील चार दिवसात दोनदा वाघ आणि बिबट्यांचा वावर असल्याचा सतर्कतेचा इशारा वन विभाग आणि ग्रामस्थांना देण्यात आला आहे. वन विभागाच्या पेंच व्याघ्र प्रकल्पाचा समावेश असलेल्या वन्यजीव क्षेत्रासह प्रादेशिक विभागातही खापा व पारशिवनी परिसरात ही यंत्रणा कार्यान्वित होत आहे.

नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प आणि चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातही ही यंत्रणा उभारण्याचा प्रस्ताव असून यासंदर्भात वन विभागाचा मार्व्हल संस्थेशी सामंजस्य करार झाला असल्याचे नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी सांगितले.

## शिर्डीच्या साईबाबा संस्थानलाही गॅस टंचाईचा फटका, आजपासून भाविकांना एकच लाडू प्रसादाचे पाकीट मिळणार

**शिर्डी/प्रतिनिधी :** इराण- इस्रायलमधील तणावाच्या पार्श्वभूम ीवर देशासह महाराष्ट्रात गॅस सिलेंडरचा तुटवडा (थ्इउ ीगेे) जाणवू लागला आहे. गॅस टंचाईमुळे शिर्डीच्या प्रसिद्ध साईबाबा संस्थानवर मोठा परिणाम झाला आहे. रोज लाखो भाविक शिर्डी येथे दर्शन घेण्यासाठी येत असतात. त्यांना प्रसाद म्हणून लाडूचे पाकीट वाटप केले जाते. मात्र, सध्या गॅसच्या मर्यादित साठ्याम ुळे संस्थानने प्रत्येक भाविकाला फक्त एक लाडू पाकीट देण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय गॅस वापरात बचत करण्यासाठी घेतल्याचे संस्थानने स्पष्ट केले आहे.

साई संस्थानाने दिलेल्या माहितीनुसार, दिवसभरात सध्या ४५ हजार लाडू पाकीटांची विक्री होते, तर दर्शनार्थी रांगेत दररोज सुमारे ५० हजार बुंदी पाकीटांचे मोफत वितरण केले जाते. गॅस टंचाईमुळे लाडू बनविण्यासाठी लागणाऱ्या इंधनावर कट घालणे आवश्यक झाले आहे, त्यामुळे आर्थिक फटका संस्थानला बसणार आहे.सध्या संस्थानाकडे लाडू बनविण्यासाठी लागणारा गॅस दहा ते बारा दिवस पुरेल इतकाच शिल्लक आहे. त्यामुळे साई संस्थानाने गॅस बचतीसाठी प्रत्येक भक्ताला फक्त एक लाडू पाकीट देण्याचा निर्णय घेतला आहे. भक्तांना या निर्णयामुळे रोज फक्त एक लाडू पाकीट मिळणार आहे. गॅस वापरात काटकसर करण्यासाठी साई संस्थानने हा मोठा निर्णय घेतला आहे.

गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर शिर्डीच्या साई संस्थानने प्रसादालयातील भोजन व्यवस्थेतही मोठा बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. यापुढे प्रसाद भोजनात दोन भाज्यांऐवजी एकच भाजी, तसेच डाळ-भाताऐवजी तांदळाची खिचडी दिली जाणार आहे. यामुळे प्रसादालयाच्या मेनूमधून डाळ-भात वगळण्यात आला असून आता भाविकांना एक भाजी, चपाती आणि खिचडी असे साधे भोजन दिले जाणार आहे.

# गोपाल महाराज पितळे यांची स्वामी चिदानंद यांच्याशी चर्चा

## राष्ट्रीय योग समन्वय समिती गठीत करण्याची मागणी; सर्व भक्तीपंथांमध्ये योगाचा अवलंब व्हावा यासाठी पुढाकार

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर येथील कीर्तनकार व नरसिंह संस्थानचे विश्वस्त हभप गोपाल महाराज पितळे यांनी ऋषिकेश येथे जाऊन ७ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय योगगुरु स्वामी चिदानंद सरस्वती यांची भेट घेऊन चर्चा केली. देशातल्या सगळ्या भक्तीपंथांचा योगप्रसाराच्या दृष्टीने समन्वय होण्यासाठी 'राष्ट्रीय योग समन्वय समिती'चे गठन करण्यात यावे, अशी आग्रही मागणी यावेळी पितळे महाराजांनी त्यांच्याकडे केली.

ऋषिकेश येथील परमार्थ निकेतनचे प्रमुख स्वामी चिदानंद सरस्वती हे जागतिक मान्यता असलेलं व्यक्तित्त्व आहे. संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक मंचावर त्यांनी इंग्रजीतून केलेली भाषणे गाजली आहेत. 'गंगा आरती' या कल्पनेचे ते जनक आहेत. योगप्रसारासाठी जगभर भ्रमंती करत असताना दरवर्षी ते ऋषिकेशला जागतिक योग महोत्सव भरवतात. यावर्षी या महोत्सवामध्ये ९२ देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.

भारतामध्ये वारकरी संप्रदाय, वीरशैव संप्रदाय, दक्षिणेतला अलवार पंथ, उत्तरेतला रामानंदी संप्रदाय, गुजरातचा स्वामीनारायण पंथ, बंगालचा इस्कॉन, हरेकृष्ण संप्रदाय, निरंकारी पंथ, दत्त संप्रदाय, पुष्टी मार्ग, रामानुज संप्रदाय, शाक्त संप्रदाय, महानुभाव पंथ, गायत्री परिवार, स्वाध्याय परिवार यांसारखे असंख्य भक्तीपंथ आहेत. हे सर्व पंथ आपापल्या धारणेप्रमाणे देवाची भक्ती करत असतात. मनाच्या शुद्धीसाठी देवाची भक्ती करणाऱ्या या पंथांनी तनाच्या शुद्धीसाठी योग करण्याचीही गरज आहे.

या सर्व संप्रदायांच्या धुरीणांनी आपल्या अनुयायांना योगाचा स्वीकार करण्यासाठी प्रेरित करणे गरजेचे आहे. यासाठी सर्व संप्रदायांच्या दोन-दोन प्रतिनिधींना घेऊन शासनाच्या सहयोगाने 'नॅशनल को-ऑर्डिनेटिंग कमिटी फॉर योगा' (राष्ट्रीय योग समन्वय समिती) गठीत करण्यात यावी व यासाठी आपण पुढाकार घ्यावा, अशी मागणी पितळे यांनी स्वामीजींकडे केली. तसेच याविषयी केंद्रीय आयुष राज्यमंत्री ना.प्रतापराव जाधव यांच्याशी चर्चा करेन असे स्वामीजींना सांगितले.

चर्चेत स्वामीजींनी ही कल्पना मनापासून पटली असल्याचे सांगून सकारात्मकता दर्शवली.



पंतप्रधानांच्या प्रयत्नांमुळे योगदिन जगभरात साजरा होतो. त्यामुळे भारतातल्या धार्मिक क्षेत्रात योगप्रसाराची नितांत गरज आहे. याबाबत निकटच्या भविष्यामध्ये काय करता येईल याबाबत गंभीरतेने विचार करेन तसेच योग्य व्यक्तींशी संपर्क साधेन असे त्यांनी आश्वस्त केले. तसेच अभिनव विचार पुढे आणल्याबद्दल त्यांनी गोपाल महाराज पितळे यांचे अभिनंदन केले.